महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २४/०२/२०२३

परिपत्रक -

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय, क्र.प्रानिमं १२२३/प्र.क्र.१४/का.१३अ, दिनांक १४/०२/२०२३.

**विषय** :- टि.सी.एस.-आयओएन (टाटा कन्सल्टसी सर्व्हिसेस लिमिटेड) व आय.बी.पी.एस. (इंस्टिट्युट ऑफ पर्सोनल सिलेक्शन ) या कंपनीमार्फत स्पर्धा परीक्षा प्रक्रिया राबवितांना प्रति उमदेवार परीक्षा शुल्क निश्चित करणेबाबत.

******

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय, क्र.प्रानिमं १२२३/प्र.क्र.१४/का.१३अ,दि.१४.०२.२०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०२१४१८५६०३७३०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( विनय राणे )
वरिष्ठ कार्यालय अधीक्षक,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक,लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह )
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना /प्रशासन / नियोजन व समन्वय / विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /दहशतवाद विरोधी पथक/ आर्थिक गुन्हे /नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक / पोलीस उप महानिरीक्षक



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना /प्रशासन / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग/ सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक,व्हीआयपी सुरक्षा, मुंबई /मोटार परिवहन विभाग, पुणे / नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे/महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल,पुणे व नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४



Scanned with CamScanner

टि.सी.एस.-आयओएन (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड) व आय.बी.पी.एस. (इंस्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन) या कंपनींमार्फत स्पर्धा परीक्षा प्रक्रिया राबविताना प्रति उमेदवार परीक्षा शुल्क निश्चित करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: प्रानिमं १२२३/प्र.क्र.१४/का.१३-अ**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ फेब्रुवारी, २०२३.

वाचा : -१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ४ मे, २०२२.

२) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक : प्रानिमं १२२२/प्र.क्र.१३६ /का.१३-अ, दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२.

प्रस्तावना: -

भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरीता घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा ऑनलाईन पध्दतीने टि.सी.एस.-आयओएन (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड ) व आय.बी.पी.एस.(इंस्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन) या कंपन्यांमार्फत घेण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भांकित क्रमांक २ येथील दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये टि.सी.एस.-आयओएन व आय.बी.पी.एस. कंपन्यांना विभाग/कार्यालयांनी अदा करावयाचे प्रति उमेदवार परीक्षा दर नमूद करण्यात आले आहेत.

टि.सी.एस.-आयओएन व आय.बी.पी.एस. या कंपन्यांना विभाग/कार्यालयांनी अदा करावयाचे प्रति उमेदवार परीक्षा दर वेगवेगळे आहेत. सदर दरात कर व प्रशासकीय खर्च समाविष्ट करुन विभाग/कार्यालयांनी आकारावयाचे प्रति उमेदवार परीक्षा शुल्क निश्चित करावयाचे आहे. कंपन्यांचे दर वेगवेगळे असल्याने पर्यायाने प्रति उमेदवार परीक्षा शुल्कही वेगवेगळे आकारले जात असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली. त्या अनुषंगाने कंपनीच्या प्रति उमेदवार दरात कर (जी.एस.टी.) व प्रशासकीय खर्च या बाबी समाविष्ट करुन उमेदवारांकडून एकच परीक्षा शुल्क आकारण्याबाबतच्या प्रस्तावास मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक ३१ जानेवारी, २०२३ च्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्यानुसार, भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील पदभरतीच्या स्पर्धा परीक्षेचे प्रति उमेदवार एकच परीक्षा शुल्क निश्चित करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदे सरळसेवेने भरताना स्पर्धा परीक्षा टि.सी.एस.-आयओएन (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड) व आय.बी.पी.एस. (इंस्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन) या कंपन्यांमार्फत ऑनलाईन पध्दतीने घेताना कंपन्यांना द्यावयाची रक्कम, कर व प्रशासकीय खर्च मिळून प्रति उमेदवार रु.१,०००/- इतके परीक्षा शुल्क आकारण्यात यावे व या परीक्षा शुल्कात राखीव प्रवर्गासाठी १०% सवलत देण्यात यावी.

Scanned with CamScanner

२. उमेदवारांकडून प्राप्त होणाऱ्या परीक्षा शुल्काच्या रकमेतून परीक्षेचा खर्च भागवावा व काही रक्कम उरल्यास ती शासनाच्या एकत्रित निधीमध्ये जमा करावी. तसेच आवश्यकतेप्रमाणे काही अतिरिक्त प्रशासकीय खर्च लागल्यास तो भागविण्यासाठी विभाग/कार्यालयांनी अर्थसंकल्पात तरतूद करुन सदर खर्च भागवावा.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये टि.सी.एस.-आयओएन व आय.बी.पी.एस. या कंपन्यांना विभाग/कार्यालयांनी द्यावयाचे प्रति उमेदवार परीक्षा दर नमूद केले आहेत. सदर दरानुसार विभागांनी कंपनीसमवेत करार करावा व त्याप्रमाणे कंपनीस रक्कम अदा करावी.

४. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णय क्रमांक: प्रानिमं १२२२/ प्र.क्र.१३६/का.१३-अ, दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ मधील परिच्छेद क्रमांक २ “परीक्षा शुल्क” मधील (अ) व (ब) वगळून इतर तरतूदीत कोणताही बदल नसून, त्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टासह यापुढे यथास्थिती लागू राहतील.

५. हे आदेश सदर शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येतील. परंतु हा शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकापूर्वी पदभरतीकरीता जाहिरात प्रसिध्द होऊन परीक्षा शुल्क निश्चित करुन प्रक्रिया सुरु झाली असेल, अशा प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: प्रानिमं १२२२/ प्र.क्र.१३६/का.१३-अ, दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ नुसार कार्यवाही करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२३०२१४१८५६०३७३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRASHANT SAJANIKAR

Digitally signed by PRASHANT SAJANIKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=471c7cbe63d119adc5855a3c23ed95de986c1c7bc41d6f6cdd3767b3ebe74c82, pseudonym=19939F8B3C9B8C6C56014628463D708305EA65C7, serialNumber=217003E42C820EC29C89162937F98929453CC6295B34F71EA285041053A66AA7, cn=PRASHANT SAJANIKAR
Date: 2023.02.14 19:02:08 +05'30'

**( प्रशांत साजणीकर )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
३) मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
४) सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
५) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
६) सर्व मा.संसद सदस्य, मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
८) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
९) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)- त्यांनी हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.
१०) *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११) *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१२) *प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१३) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,



Scanned with CamScanner

१४) * सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१५) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१६) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद) मुंबई,
१७) *राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१८) *सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१९) *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई,
२०) *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
२१) *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र/नागपूर,
२२) *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र/नागपूर,
२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता ५ प्रती),
२४) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१०प्रती),
२५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२७) मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,
२८) सर्व जिल्हाधिकारी,
२९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३०) सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख- (मंत्रालयीन विभागामार्फत),
३१) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
३२) निवडनस्ती.

*पत्राने

****



Scanned with CamScanner